# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. २२८/२०२१

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित काही महाविद्यालये आणि काही मान्यताप्राप्त संस्थांना स्वायत्त दर्जा प्राप्त झालेला आहे. तसेच नजीकच्या काळात आणखी काही महाविद्यालये /मान्यताप्राप्त संस्थांना स्वायत्त दर्जा प्राप्त होण्याची शक्यता आहे. स्वायत्त दर्जा प्राप्त संलग्नित महाविद्यालये /मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या समस्या व अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाच्या सुकरतेसाठी मार्गदर्शक नियमावली तयार करण्यासाठी मा. कुलगुरू यांनी समिती गठित केली होती. सदर समितीने सादर केलेला अहवाल मा. कुलगुरू यांनी स्वीकारलेला असून यातील शिफारशी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ व सन २०१९ एकरूप परिनियम क्र. ३ मधील तरतुदी विचारात घेता स्वायत्तता दर्जा प्राप्त संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थांसाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात येत आहेत.

१. स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांना या अधिनियमाच्या तरतूदी व परिनियम आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे यांच्या अधीन राहून, पूर्ण विद्याविषयक व प्रशासकीय स्वायत्तता असेल.

२. स्वायत्त दर्जा प्राप्त संलग्न महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था परिनियमामध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरल्यानंतर, स्वत:चे अभ्यास पाठयक्रम विहित करू शकतील.

३. स्वायत्त दर्जा प्राप्त संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था विद्यापीठाला संलग्न असल्यामुळे त्यांना अधिनियमातील कलम ४१ (ड), १०७(३), १०९(१), १०९(४), १०९(९), ११०(१) या तरतूदी लागू राहतील.

४. कलम १०१ (१) मध्ये शुल्क निर्धारण समितीमध्ये ''स्वायत्त महाविद्यालये व स्वायत्त परिसंस्था यांच्या व्यतिरिक्त विद्यापीठ, महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी व्यवस्थापन केलेल्या व चालविलेल्या आणि राज्य शासन, केंद्र सरकार आणि स्थानिक प्राधिकरणे यांच्याकडून त्यांचे व्यवस्थापन केलेल्या व चालविलेल्या प्रत्येक पदवीपूर्व व पदव्युत्तर पाठयक्रमांचे किंवा अध्ययनक्रमांचे वास्तव मूल्य ठरविण्यासाठी एक शुल्क निश्चिती समिती असेल'' असा स्पष्ट उल्लेख आहे.



Radhy 26/8/2021

५. स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालयांमध्ये असलेल्या विद्यमान तुकडयांबाबत निर्णय घेऊन, प्रारंभी एक तुकडी सुरू करण्यात यावी व अशा जास्तीत जास्त ५ तुकडया सुरू करता येतील.

६. स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालयांमध्ये नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांच्या नावात (nomenclature) मध्ये बदल करू नये, ते विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ५ जुलै, २०१४च्या राजपत्रातील मार्गदर्शक सूचनांप्रमाणेच असणे बंधनकारक आहे. नव्याने प्रस्तावित करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाचे संपूर्ण नाव (full name) व संक्षिप्त नाव (short name) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ५ जुलै, २०१४च्या राजपत्रातील मार्गदर्शक सूचनांप्रमाणेच असावे.

७. स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालयांमधील नवीन अभ्यासक्रमांची रचना (structure) निश्चित असावी. स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालयांनी पुढील शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचे प्रस्तावित असलेल्या अभ्यासक्रमांचा संपूर्ण आराखडा आणि नवीन अभ्यासक्रमांचे संलग्नीकरण अर्ज अगोदरच्या वर्षीच्या दि. ३० सप्टेंबर पूर्वी विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे.

८. स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालयांमधील नवीन अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरणासाठीचे शुल्क विद्यापीठाकडून फक्त एकदाच आकारण्यात यावे. संलग्नीकरण शुल्क आकारताना, सदर महाविद्यालयाचे स्वायत्तता दर्जाच्या १० वर्षांच्या कालावधीत नवीन ३–४ अभ्यासक्रम सुरू करण्यासाठीचे शुल्क गृहीत धरून एकरकमी शुल्क आकारण्यात यावे.

९. स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालयांनी नवीन अभ्यासक्रम सुरू करताना विद्यार्थी प्रवेशक्षमता विद्यापीठाच्या प्रचलित नियमाप्रमाणे असणे बंधनकारक राहील.

१०. स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालयास नवीन अभ्यासक्रम प्रस्तावित करताना त्यासाठीची आवश्यक भौतिक सोयी–सुविधा, अध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांची उपलब्धता असल्याबाबतचा पुरावा स्वायत्तता दर्जा प्राप्त महाविद्यालयाच्या विद्यापरिषदेच्या मान्यतेने प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक राहील.

११. स्वायत्तता दर्जा प्राप्त महाविद्यालयांनी पदव्युत्तर पदवी स्तरावरील अभ्यासक्रम सुरू करताना त्या विषयातील पदवी अभ्यासक्रमाच्या किमान २ बॅचेस बाहेर पडलेल्या असणे आवश्यक आहे.

Raby 26/8/2021

१२. स्वायत्तता दर्जा प्राप्त महाविद्यालयांना इतर स्वायत्तता दर्जा प्राप्त महाविद्यालयातील किंवा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना पदवीच्या द्वितीयवर्षास प्रवेश देता येईल. यासाठी स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालयाच्या विद्यापरिषदेने समकक्षता समिती स्थापन करून समकक्षता पासून त्यानंतरच प्रवेश देण्याची कार्यवाही त्यांच्या स्तरावर करावी व अशा विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या शैक्षणिक पात्रता विभागास विहित पद्धतीने सादर करावी.

गणेशखिंड, पुणे–४११००७ )
जावक क्र. सीए/७२६३ )
दिनांक २६ ऑगस्ट, २०२१ )

26/8/2021

(मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

प्रत :

१. मा.प्राचार्य/संचालक, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
२. मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश आणि पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ